MHBI060007942023

## आदेश नि. क्र. २७ खाली

अर्ज नि. २७ हा प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची गट नं. ७९/२ मधिल क्षेत्राच्या मोजणीकरीता तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांची नेमणूक करण्याबाबत दिवाणी संहिता कायदा आदेश २६ नियम ९ प्रमाणे दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने सदर दावा वाद मिळकतची मालकी घोषीत करून चिरकाल मनाई हुकूम मिळविण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी तर्फे पुन्हा असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीने यापुर्वी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांची कोर्ट कमीशनर म्हणून नियुक्ती करण्याकरिता अर्ज केला होता आणि तो मंजुर करण्यात आला होता. प्रकरणातील जमीन ही सर्व्हे क्र. ७९ हा ७९/१, ७९/२, ७९/३ व ७९/४ यामध्ये विभागणी झालेला असुन दाव्यात गटाचे संपूर्ण क्षेत्र व चतु:सिमा कोर्टासमोर न्यायबाजु येण्याकरीता संपूर्ण गटाचे सर्व्हे क्र. ७९ ची कोर्ट कमिशनर निशाणी क्र. १९ प्रमाणे करणे आवश्यक आहे. प्रकरणात कोर्ट कमिशनर यांनी संपूर्ण सर्व्हे क्र. ७९ चा नकाशा, अहवाल व वस्तुस्थीती न्यायालयासमोर सादर केली तर वास्तविक परिस्थीती कोर्टासमोर येईल व जी गुणवत्तेवर न्यायदानाकरीता आवश्यक आहे. वादीने केवळ सर्व्हे क्र. ७९/२ ची कोर्ट कमीशनर करून मागणी केली आहे मात्र चतु :सिमा, नकाशा, क्षेत्र, ताबा इत्यादी बाबी करीता व वस्तुस्थीती संपुष्टात येण्याकरीता सर्व्हे क्र. ७९ ची मोजणी करण्याकरीता कोर्ट कमिशनर नेमणे आवश्यक आहे. वास्तविक दावा जरी ७९/२ बाबत असला तरी ७९/२ च्या चतु:सिमा, क्षेत्रफळाबाबत वाद पुराव्यात स्पष्टपणे बोध होण्याकरीता तालुका

निरीक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांची नेमणूक करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. याउलट वादी तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ च्या अर्जातील कलम १ ते ४ मधील मजकुर खोटा असुन प्रतिवादी क्र. १ यांनी सर्व्हे क्र. ७९/२ ची कोर्ट कमिशनर म्हणून मागणी केली आहे परंतु चतु:सिमा, नकाशा, क्षेत्र व ताबा इत्यादी बाबीकरीता गट क्र. ७९ ची संपूर्ण मोजणी करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जात केलेली मागणी ही कायदयाच्या व वस्तुस्थीतीचया विरूध्द असल्याने प्रतिवादी क्र. १ चा अर्ज खर्चासह खारीज करणे न्यायोचीत आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदर दावा वाद मिळकत चा मालक घोषीत करणे तसेच वादमिळकतीची मोजणी करून चिरकाल मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केल्याचे दिसून येते. वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद हा बांध निश्चिती संदर्भात असल्यामुळे त्यांच्यातील वाद संपुष्टात आनण्याकरीता प्रतिवादी क्र. १ यांच्या मिळकतीच्या हद्दी व खुणा कायम होणे आवश्यक आहे. म्हणून दोन्ही पक्षाच्या कथनांचा, युक्तीवादांचा व न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदोपत्रांचा विचार करता वाद मिळकतीची वस्तूस्थिती समोर आणणेकरीता प्रतिवादी क्र. १ यांच्या मिळकतीची मोजणी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांचेमार्फत करणे आवश्यक व संयुक्तीक आहे, करीता खालीलप्रमाणे आदेश :

## आदेश

१. अर्ज नि. क्र. २७ मंजूर करण्यात आला.

२. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मौजे अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जिल्हा बीड येथील प्रतिवादी क्र. १ यांची गट क्र. ७९ च्या संपूर्ण क्षेत्राची म्हणजेच गट क्र. ७९/१, ७९/२, ७९/३ व ७९/४ या गटाची मोजणी करून सदर जमीनीच्या हददी व खुणा कायम कराव्यात.

३. प्रतिवादी यांनी कमिशन फीस भरावी.

४. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांनी दोन्ही पक्षकारांना पुर्वनोटीस देवून कमिशनचे काम करावे व त्यांचा अहवाल अहवाल लवकरात लवकर न्यायालयात दाखल करावा.

५. प्रातिवादीने प्रोसेस फी भरल्यानंतर कमीशन रिट पाठविण्यात यावे.

सही/—

ठिकाण : अंबाजोगाई
दिनांक : २४.११.२०२५

( ए.एम.ढवळे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंबाजोगाई.

:: **<u>Certificate of Stenographer</u>** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 24/11/2025.
Transcribed On : 24/11/2025.
Checked & Signed On : 24/11/2025.
Date : 24/11/2025.
Place : Ambajogai.

Digitally signed by GANGANE ANKUSH SADASHIV
Date: 2025.11.24 17:39:54 +0530

Sd/-
**( A.S.Gangane )**
Steno
3 rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai.